# वा वा नेटाक्षरी

२२.१२.२००८
अंक : ५

वा ह वा..
**मराठी शायरीच्या ह्या जानदार मैफिलीत रसिकांचे सहर्ष स्वागत.**

मराठी शायरीचे खरे “शेर” भाऊसाहेब पाटणकर उर्फ **वा.वा.**
ह्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष.
हे औचित्य साधून आम्ही सजवलीय मराठी शायरीची मैफिल



## ह्या अंकात वाचा....

- वा.वां च्या शायरी विषयी सांगताहेत मराठीतील प्रसिध्द कवी व शायर श्री.शाम पाडेकर.
- शेराची शायरी
- अतिथी संपादकाचा परिचय व शायरी
- दुनिया तुला विसरेल..

## संपादक मंडळ

**संपादक -**

स्वप्ना कोल्हे ( नाशिक )

**अतिथी संपादक –**

शाम पाडेकर ( नाशिक )

**सहसंपादक -**

सोनाली घाटपांडे ( पुणे )
रेणूका रेपाळ ( अमेरिका )
सुरुची नाईक ( नागपूर )
आनंद माने ( सोलापूर )
नाम गुम जायेगा ( ठाणे )

©या अंकाचे सर्व हक्क कवींच्या स्वाधीन

अशीच एक रंगलेली ऑर्कुट मैफिल -



हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी..
netaksharee@gmail.com

## मराठी शायरीचे खरे "शेर" - भाऊसाहेब पाटणकर



हिंदी,उर्दू भाषेतला गजल हा काव्यप्रकार जसा मराठी मध्ये रुजला तसाच शायरी हा काव्यप्रकारही रुजला,फुलला.आणि हा काव्यप्रकार मराठी मध्ये आणण्याचे श्रेय मराठीतील आद्य शायर भाऊसाहेब पाटणकर ह्यांना जाते.अर्थात भाऊसाहेबांची अखेरपर्यंत इच्छा होती त्याप्रमाणे मराठी शायरीचा प्रचार व प्रसार हवा तेवढा झाला नाही हेही तितकेच खरे.

२००८ हे वर्ष यवतमाळमध्ये जन्मलेल्या भाऊसाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. ( तेही यवतमाळकरांच्या वतीनेच कारण दुर्दैवाने मराठी काव्य प्रांतातील इतरेजनांना भाऊसाहेबांचा कधीच विसर पडला आहे.) भाऊसाहेबांनी आपल्याच एका शेरात म्हटले आहे की,

गालिब,अरे,अमुच्याहि दारी,आहेच कीर्ती यायची
फक्त आहे देर थोडी,मरणास अमुच्या यायची
येणार ना अमुच्या पुढे ती,प्राण असती तोवरी
कीर्ती प्रिया माझी अरे,ही भलतीच आहे लाजरी

भाऊसाहेबांच्या बाबतीत हे अगदी खरे ठरले की,ही कीर्ती प्रिया त्यांच्या हयातीत जशी समोर आली नाही तशीच ते गेल्यानंतरही आली नाही.

इश्क,शृंगार,विनोद,मृत्यू,तत्वज्ञान अशा विविध विषयांना धरुन भाऊसाहेबांनी जी शायरी लिहली आहे.ती एका वेगळ्या काव्याविष्काराचा अप्रतिम नमुना आहे.अवघ्या दोन किंवा चार ओळींत एखादी कल्पना उत्कटपणे मांडायला कविची प्रतिभा तेवढीच उत्कट असावी लागते.

शेर दोन ओळींचा असेल तर पहिल्या ओळीत आणि चार ओळींचा असेल तर पहिल्या दोन किंवा तीन ओळीत विषयाची प्रस्तावना करणे,ऐकणाऱ्याची उत्कंठा वाढवत नेणे व शेवटच्या ओळीत त्याचा अत्युच्च बिंदू (climax) साधणे किंवा अनपेक्षित धक्कादायक कलाटणी देणे हे उत्कृष्ट शेराचे गमक आहे.भाऊसाहेबांचा कुठलाही शेर वाचला तर तो अशा प्रकारे परिपूर्ण वाटतो.

पांढरे शुभ्र तलम धोतर,पांढराशुभ्र झब्बा,तोंडात रंगलेलं पान अशा "रंगेल" रुपात ज्यांनी भाऊसाहेबांना मैफल सजवतांना बघितलं असेल,ऐकलं असेल ते रसिक ती मैफल कधीही विसरणं शक्य नाही.एक एक शेर सादर करत भाऊसाहेब रसिकांकडून दाद वसुल करत.तशी भाऊसाहेबांच्या नावाची आद्याक्षरं वा.वा.पाटणकर अशी.त्यास साजेशीच जणु मैफलीत त्यांच्यावर वा वा ची बरसात होत असे.

भाऊसाहेब तसे व्यवसायाने वकिल.पण,वकिलीसारख्या रुक्ष व्यवसायातही त्यांनी आपली रसिकता जिंदादिलीनं जपली.फारसी,उर्दू,संस्कृत भाषांतील काव्य त्यांनी नुसतं अभ्यासलंच नाही तर शायरी व संस्कृत श्लोक त्यांच्या ओठांवर असायचे.आणि मराठी शायरी बरोबरच त्यांच्या बोलण्यातून त्याचा ओघ सतत सुरु असायचा.हा सिलसिला निवृत्ती नंतरही सुरुच होता अगदी अखेर पर्यंत.

जीवनाबरोबरच मृत्यूवरही जिवंत शायरी करणाऱ्या अशा भाऊसाहेबांचे जन्मशताब्दी वर्ष त्यांच्या स्वतःच्या गावात का होईना दि.२८ व २९ डिसेंबर २००८ रोजी साजरे होत आहे.त्या निमित्ताने भाऊसाहेबांवरील स्मृती ग्रंथ प्रकाशित होत असून "मराठी शायरी" ह्या विषयावरील चर्चासत्र मराठी मुशायरा आयोजित करण्यात आला असून महाराष्ट्रातील **शाम पाडेकर,बी.के.शेख,संजय बामलीकर,विजया एंबडवार,डॉ.स्वानंद पुंडे,विश्वास वर्तक** ह्या ६ निवडक शायरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.ह्या समारंभात सुप्रसिध्द विचारवंत राम शेवाळकर,कवि फ.मु.शिंदे,रामदास फुटाणे हे उपस्थित राहणार आहेत.

मी व नेटाक्षरी..भाऊसाहेब पाटणकर जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून त्यांच्यावरील विशेषांक प्रकाशित करुन मराठी शायरीच्या ह्या खऱ्या शेराला कुर्निसात करीत आहोत.

**- श्री.शाम पाडेकर**
**( अतिथी संपादक )**

## शेराची शायरी : भाऊसाहेब पाटणकर उर्फ वा.वा.ह्यांचे काही शेर

❖

दोस्तहो,हा इष्क काही ऐसा करावा लागतो
ऐसे नव्हे नुसताच येथे जीव द्यावा लागतो
वाटते,नागीण ज्याला खेळण्या साक्षात हवी
त्याने करावा इष्क,येथे छाती हवी,मस्ती हवी

❖

अपुल्याच दाती ओठ अपुला चावणे नाही बरे
हक्क अमुचा अमुच्या समोरी मारणे नाही बरे

❖

होते असे भलतेच काही,इष्कातल्या जगती इथे
हृदयही तेथेच जुळते,नजराही ना जुळती जिथे

❖

ना म्हणू इष्कातले या,सौंदर्य त्याला समजले
झाल्यावरी बर्बाद ज्याला,बरबाद झालो समजले
मद्यात ही सांगा नशा,मग काय आहे राहिली
झाल्यावरी बेहोष याची जाणीव जेथे राहिली

❖

पेड वेणीचे नव्हे जे वक्षावरी तू सोडिले
रक्षिण्या धन यौवनाचे नाग सोडिले
जाणतो प्राणाहुनही यांस तू सांभाळिसी
ना कळे आम्हासही ही *dog in the manger policy*

❖

जेव्हा कधी या दर्पणी माझे मला मी पाहिले
लाजले जैसे मला दुसऱ्याच कोणी पाहिले
पडदा तरिही मी मुखाचा काढून घेतला नव्हता
प्रत्येकदा त्या दर्पणाला पडद्यात होता घेतला

❖

नाजुकता ऐसी कुणी पाहिली नाही कधी
नजरही आम्ही तिच्यावर टाकली नाही कधी
भय आम्हा नाजुकतेचे हेच होते वाटले
भार ही नजरेतला सोसेल नव्हते वाटले

❖

जाणते ती लाख नुसत्या जीव घेण्याच्या तऱ्हा
सरळ आहे भांग आणि निष्पाप आहे चेहरा

❖

सौंदर्य वलयातून त्यांची दिसली जरा रेखाकृती
तेजातूनी अपुल्याच जैसी सौदामिनीची आकृती
ऐसे जरी ऐसे नव्हे नाही तिला मी पाहिले
गेले दिपोनी नेत्र आम्ही मिटल्याच नेत्री पाहिले

❖

इतुका तरी हा स्पर्श हृदया होईल होते वाटले
इतुके तरी सद्भाग्य उदया येईल होते वाटले
कल्पना नाजुकतेची आम्हासही नव्हती कधी
गेली अम्हा तुडवून आम्हा कळलेच ना,गेली कधी

❖

पेल्यातले प्या मद्य,पण ओठातले प्राशू नका
दुरुनीच याची ये नशा जवळी या जाऊ नका
स्पर्शणे तर दूर राहो,बघितले नुसते जरी
याची नशा,मी सांगतो,उतरते मेल्यावरी







❖

त्याला कुठे का इष्क ऐसे आहे मिळाले नावही
नावासही ना हाय जेथे,ना आसवांचे नावही
आसूविना जो इष्क येतो,कोणासही तो भोगता
भोगता इंद्रास येतो,कुत्र्यास येतो भोगता

❖

जागलो कित्येक रात्री फक्त तुझिया चिंतनी
लाविले ना नेत्र पळही गीतेतला जणू संयमी
आजही मी जागतो इतुक्याचसाठी रात्र ही
भेट ना होवो तुझी माझी आता स्वप्नातही

❖

सांग मी मरणार कैसा नेत्रबाणांनी तुझ्या
जाणतो निःशंक,आहे संजीवनी अधरी तुझ्या

❖

आता कुठे त्या मेनका,मी कोठून आणू उर्वशी
आज तर नाही उशाशी,फाटकी साधी उशी
सांगतो,नाही तरीही,इष्क काही संपला
संपला जो काय त्याचा,पूर्वार्ध नुसता संपला

❖

भिती तिला प्रणयात कोणी पाहिल याची वाटते
येवूनही स्वप्नी माझ्या हेच तिजला वाटते
म्हणते कशी कैसी तरी स्वप्नात या आले तुझ्या
सारेच पण आहेत बाई भोवती जागे तुझ्या
जाणते सर्वांस यांना मीही नव्हे साधी तशी
स्वप्नातही येतील मेले मी जशी आले तशी

❖

भेटण्या जेव्हा तिच्या स्वप्नात मी गेलो तिथे
स्वप्नातही अपुल्या स्वतःच्या हाय ती नव्हती तिथे
त्रास ऐशा अप्सरेला हाच असतो सारखा
नेतो तिला उचलून जो तो अपुल्याच स्वप्नी सारखा

❖

येवूनही तेथे आम्हा ना भेटूनी गेलीस तू
ऐकतो स्वप्नात माझ्या येऊनी गेलीस तू
यातही उपकार आम्हा काही कमी ना वाटले
स्वप्नातही येशील ऐसे स्वप्नात नव्हते वाटले

❖

आजवरी नुसतेच होतो स्वप्नात तुजला भेटलो
हे खरे की आज ऐसे प्रत्यक्ष आहो भेटलो
हाय माझ्या दुर्दशेला अंत नाही राहिला
आज या प्रत्यक्षतेचा विश्वास नाही राहिला

❖

आहे जरी हे स्वप्न खोटे,हेच प्रिये मज वाटते
काय सांगू,भय मनाला,जागृतीचे वाटते

❖

पाऊलही दारी तुझ्या जाणून मी नाही दिले
जपलो तुझ्या नावास,नाही बदनाम तुज होऊ दिले
स्वप्नातही माझ्या जरी का येतीस तू आधी मधी
स्वप्नही आम्ही कुणाला सांगितले नसते कधी

❖

चुंबने जोरात आम्ही नाही आताशे घेतली
वाटले द्यावी तशी नाही तरीही घेतली
काळजी नाजूकतेची त्यांच्या तशी नव्हती मला
होती जरा माझ्याच खोट्या दंतपंक्तींची मला

❖

वृध्द मी,नाही जरी निवृत्त झालो फारसा
सोडिल्या मी दोन गोष्टी,कंगवा अन आरसा

❖

होती जरी अपमान आता जीवनी आधी मधी
साहतो हासून जैसे काहीच न झालेच कधी
साधु परी या राग लोभा नसते अम्हीही सोडले
आम्हासही नसते जरी का यौवनाने सोडले

❖

केव्हातरी बघुनी जराशी हांस बस इतुके पुरे
वाळलेल्या हिरवळीला चार शिंतोडे पुरे

❖

लागला धक्का तिचा जोरात पण होता मऊ
ती म्हणे *sorry* मला,मी म्हणालो *thank you*

❖

चंद्रमा हासे नभी शांत शीतल चांदणे
आमुच्या आहे कपाळी अमृतांजन लावणे
लावण्या हेही कपाळी नसतो तसा नाराज मी
आहे परी नशिबात हे ही अपुल्याच हाती लावणे

❖

मजनू,अरे थोडा अम्हा का भेटला असतास तू
एकही आसू खरोखर गाळला नसतास तू
एक नाही लाख लैला मिळविल्या असत्या आम्ही
मिळविल्या नुसत्याच नसत्या,वाटल्या असत्या आम्ही

❖

खेळू नको बेधुंद ऐसा चंद्रा अरे ताऱ्यासवे
घे जरा लक्षात, आहे रोहिणीही तुजसवे
पृथ्वीवरी असता जरी का छंद तू हा घेतला
खास तुझिया रोहिणीने *divorce* असता घेतला

❖


भास्करा,येते दया मजला तुझी आधीमधी
आहेस का रे पाहिली तू रात्र प्रणयाची कधी
(यावर सूर्य शायराला उत्तर देतो)
आम्हासही या शायराची कीव येऊ लागते
याच्या म्हणे प्रणयास याला रात्र व्हावी लागते

❖

मृत्यूची माझ्या वदंता सर्वत्र जेव्हा पसरली
घबराट ईतुकी नरकलोकी केव्हाच नव्हती पसरली
प्रार्थिती देवास,म्हणती सारे अम्हाला वाचवा
वाचवा आम्हास आणि पावित्र्य इथले वाचवा

❖

गेलो जरा स्वर्गात बघण्या काय आहे ते खरे
ऐकिले जे काय आम्ही सारेच ते नव्हते खरे
ऐसे नव्हे अप्सरा स्वर्गात नसते एकही
इंद्राघरी असतात साऱ्या,बाहेर नसते एकही







❖

वेचले आयुष्य नुसती आसवे गाळीत मी
वेदीवरी या वेदनांच्या यौवना जाळीत मी
उच्चारिले उत्स्फूर्त जे मी मंत्र त्या यज्ञातले
शायरी समजू नका,हे मंत्र "त्या" यज्ञातले

❖

मृत्यो,अरे येतास जर का थोडा असा आधी तरी
ऐकूनी जातास तूही शेर एखादा तरी
एकही नाही कला तू मानवांची पाहिली
जेथे जिथे गेलास त्यांची मातीच नुसती पाहिली

❖

जीवनाची रेलगाडी ना कळे नेते कुठे
तिकीटावरी तर स्टेशनाचे नावही नाही कुठे
फुकटात ना येथे अम्हा आहे कुणी येऊ दिले
दाम साऱ्या सुकृताचे मोजुनी आम्ही दिले
गोष्टी तशा तर खुप आम्ही एकमेका सांगतो
जायचे कोणा कुठे कोणी कुणा ना सांगतो
आहे कुणी टी.सी.परी हे ना कुणा समजायचे
एकटा तो फक्त जाणे कोणा कुठे उतरायचे
फेकतो वाटेल त्याला उचलुनि खिडकीतूनी
सांगती की खुप त्याची सवय आहे ही जुनी
फेकण्या मजला जसा तो सरसावला थोडा पुढे
देहात्मतेचा कोट नुसता मी फेकला त्याच्या पुढे
उचलुनी तो कोट त्याने फेकला खिडकीतूनी
केला मला आदाब आणि अदृश्य झाला लाजुनी
रेलही अदृश्य झाली काही असेही वाचले
तिकीटावरी मी शब्द आता निर्वाण इतुके वाचले

❖

सांगेल काही भव्य ऐसी शायरी माझी नव्हे
तो कवींचा मान तितुकी पायरी माझी नव्हे
आम्ही अरे साध्याच अपुल्या जीवना सम्मानितो
सम्मानितो हासू तसे या आंसवा सम्मानितो
जाणतो अंति अम्हाला मातीच आहे व्हायचे
नाहीतरी दुनियेत दुसरे काय असते व्हायचे
मानतो देवासही ना मानतो ऐसे नव्हे
मानतो इतुकेच की,तो आमुचा कोणी नव्हे
आहो असे बेधुंद,अमुची धुंदही साधी नव्हे
मेलो तरी वाटेल मेला,दुसरा कुणी आम्ही नव्हे

❖

उबगलो दुनियेस वाटे येथे पुन्हा येऊ नये
नावही दुनियेत माझे मागे कुठे राहू नये
होता मला संतोष असते इतुके जरी मी साधले
शायरीने हाय नाही हेही अम्हांला साधले

❖

नुसतेच ना दुनियेत तुमच्या,आलो अम्ही गेलो अम्ही
भगवन तुझ्या दुनियेस काही,देऊनी गेलो अम्ही
शायरी तुला अर्पून गेलो,माझे जणू सर्वस्व ती
दुनिया तुला विसरेल भगवन,ना आम्हा विसरेल ती

❖

कफन माझे दूर करुनी पाहिले मी बाजूला
एकही आसू कुणाच्या डोळयात ना मी पाहिला
बघुनि हे,माझेच आसू धावले गालावरी
जन्मभर हासूनही मी रडलो असा मेल्यावरी

❖

रडविले देवादिका तू,ऐकली कीर्ती तुझी
रडविण्या आम्हास "दैवा" माय ना व्याली तुझी
जेव्हा कधी नयनात तू या अश्रूस होते निर्मिले
प्रत्युत्तरी तात्काळ मी ही शेर काही निर्मिले

❖

आसू सवे या आज मी ही बागेत माझ्या विहरतो
होऊनिया जलभार जैसा मेघ व्योमी विहरतो
शास्त्रातही जो स्पष्ट इतुका नाही कुठे सांगितला
अर्थ साऱ्या जीवनाचा,यांनी मला सांगितला

❖

आसूविना इश्कात आम्ही,काय दूसरे मिळविले?
दोस्तहो,माझे असो,तेही तुम्ही ना मिळविले
आता कुठे नयनांत माझ्या,चमकली ही आसवे
आजवरी यांच्याचसाठी,गाळीत होतो आसवे

❖

आसवे इतुक्याच साठी नाही कधी मी गाळिली
गाळायची होती अशी की नसतील कोणी गाळिली
आसवांच्या या धनाला जाणून मी सांभाळिले
आज या वृध्दापकाळी,यांनी मला सांभाळिले

❖

होता असाही काळ सारे नम्र होते मजपुढे
झेलण्याला शब्द माझा होते उभे मागेपुढे
आता कुठे तो काळ,त्याची खुण ही ना राहिली
आसवे माझी स्वतःच्या काबूत नाही राहिली

❖

आवेग माझ्या भावनांचे ना कळे गेले कुठे
ना कळे,की आज माझी आसवे गेली कुठे
हाय ! माझ्या जीवनी या,सारेच काही संपले
संपले केव्हाच हासू आज आसू संपले
आसवे पुसण्यास जेव्हा कोणीच नाही राहिला
थेंबही या आसवांचा डोळयात नाही राहिला
हासतो गालात येता हेही कळोनी शेवटी
होते जसे माझे रडेही दुसऱ्याचसाठी शेवटी

❖

अंतरीच्या यातनांना अमरता द्याया खरी
निर्मिला मी ताज माझ्या शायरीचा त्यावरी
वेगळा हा ताज हाही या जरा द्या पाहुनी
यमुनेसवे गंगाही येथे वाहते नयनांतुनी

❖

आसवे नयनात जर या निर्मिली नसती कुणी
नावही त्या शायरीचे ऐकिले नसते कुणी
ज्यांनी दिला हा दर्द,नयनी आसवेही निर्मिली
मी नव्हे ही शायरीही त्यांनीच आहे निर्मिली







❖

भारताची राजनीती समजण्याला लागते
षंढताही खुप,थोडी थोडकी ना लागते
खुप केला यत्न आम्ही आम्हास नाही समजली
ना कळो आम्हास,आहे पुष्कळांना समजली

❖


ऐसे नव्हे की भारती या बुध्द नुसता जन्मला
नुसताच नाही बुध्द येथे आहे शिवाजी जन्मला।
वीरतेची भारती या,ना कमी झाली कधी
आमचा इतिहास नुसता इतिहास ना झाला कधी
तीच आहे हौस आम्हा व्हावया समरी शहीद
बाजीप्रभूही आज आहे आज जो अब्दुल हमीद
बोललो इतुकेच अंती "आगे बढो आगे बढो"
देऊन गेला मंत्र जैसा "आगे बढो आगे बढो"
धर्माहुनिया श्रेष्ठ अपुल्या देशास जो या समजला
मानू आम्ही त्यालाच आहे धर्म काही समजला
जन्मला जो जो इथे तो वीर आहे जन्मला
अध्यात्म ही या भारताचा युध्दात आहे जन्मला
कुठला अरे हा पाक याचे नावही नव्हते कुठे
कळणारही नाही म्हणावं होता कुठे गेला कुठे
हे म्हणे,लढणार यांच्या दाढ्या मिशा नुसत्या बघा
पाहिली नसतील जर का बुजगावणी,यांना बघा
पाहण्याला सैन्य त्यांचे जेव्हा आम्ही गेलो तिथे
नव्हते तिथे कोणीच होते फक्त पैजामे तिथे
आहे ध्वजा नक्कीच आमुची पिंडीवरी लहरायची
फक्त आहे देर त्यांनी समरी पुन्हा उतरायची
हाच आहे ध्यास आता अन्य ना बोलू आम्ही
बोलू आम्ही जयहिंद आणि जयजवान बोलू आम्ही

❖

मत्तगंधाची जिथे रानवेलीची फुले
दिसतील तेथे जाण माझे प्रेत आहे गाडले
मोहुनी येतील जेव्हा भृंग त्या कुसुमावरी
जाणतो मस्तीत तेथे गातील माझी शायरी

❖

एकदा मेल्यावरी मी परतुनी आलो घरी
तेच होते दार आणि तीच होती ओसरी
होती तिथे तसबीर माझी भिंतीवरी त्या टांगली
खुप होती धूळ आणि कसर होती लागली
द्रवलो तिला पाहून,होती शेवटी माझीच ती
दिसली मला पण आज माझ्या प्रेताहुनी निस्तेज ती
बोलली की हीच का माझ्यावरी माया तुझी
गेलास ना टाकून,होती प्रत्यक्ष जी छाया तुझी
बोलली हेही तुला का सांगावयाला लागते
मेल्यावरी जगण्यास वेड्या खुप कीर्ती लागते
होऊनि स्वार्थांध नुसता कैसा तरी जगलास तू
आहेस का केला कुठे जगण्याविना पुरुषार्थ तू
समजली आता तरीना अपुली स्वतःची पायरी
समजले ना काय मिळते नुसती करोनी शायरी
ओशाळलो ऐकून नेली तसबीर मी ती उचलूनी
सांगतो याची तिथे चर्चाही ना केली कुणी



## अतिथी संपादक : शाम बळवंत पाडेकर

-"स्वगत" हा स्वलिखित काव्यसंग्रह प्रकाशित.
- १९७८ पासून १००० हून अधिक कार्यक्रमांचे संयोजन आणि सूत्र संचालन,निवेदन
- २५ पेक्षा जास्त नाटक,एकांकिकांचे दिग्दर्शन,अभिनय आणि निर्मिती.
- स्थानिक वृत्तपत्रातून लेखन व समिक्षण.
- भारतातील काही प्रसिध्द व्यक्तींच्या प्रकट मुलाखती घेण्याचे भाग्य – ( पं.हरिप्रसाद चौरसिया,जयश्री गडकर,निशिगंधा वाड,स्मिता तळवलकर,सुधीर गाडगीळ,दशरथ पुजारी,पद्मजा फेणाणी,कवी मधुकर जोशी,रत्नाकर मतकरी,पुरुषोत्तम बेर्डे,मोहन वाघ,संजय मांजरेकर,अशोक हांडे,चित्रकार रवि परांजपे )
- पंडित भिमसेन जोशी(अभंगवाणी), पं.हरिप्रसाद चौरसिया,अनुप जलोटा,कवी जगदीश खेबुडकर,उस्ताद झाकिर हुसेन,गझलनवाज भिमराव पांचाळे,आशा भोसले,उषा मंगेशकर यांसारख्या जागतिक कीर्तीच्या कलाकारांच्या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन.
- लोकहितवादी मंडळ ह्या संस्थेत सचिव म्हणून काम.
- अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद नाशिक शाखा कार्याध्यक्ष म्हणून काम.
- संस्कार भारती नाशिक संगीत विभाग प्रमुख म्हणून काम.
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या गोदावरी गौरव व जनस्थान पुरस्कार सोहळयाच्या आयोजनात सक्रिय सहभाग.
- स्नेहसंवर्धन मंडळ आयोजित संगीत महोत्सवाचे सुत्रसंचालन.
- स्थानिक टीव्ही चॅनलवर स्वररंग,स्वरधारा,भजन संध्या इ.कार्यक्रमांचे निवेदन.
- दूरदर्शन वरील राज दत्त दिग्दर्शित "विनायक दामोदर सावरकर" या हिंदी धारावाहिक मध्ये सावरकरांच्या वडिलांची भूमिका
- ई टीव्ही वर "पंचविशीतल्या आठवणी"साठी सुधीर गाडगीळ यांची घेतलेली मुलाखत प्रसारित.
- दूरदर्शन वरील "जानम समझा करो"कार्यक्रमासाठी निवड.
- अल्फा टीव्ही वर "श्री तशी सौ"कार्यक्रमात सहभाग.
- सी न्यूज नाशिकच्या दूरदर्शन वाहिनीच्या "गोदा उत्सवाचे"सुत्रसंचालन.
- गीत गीता दत्त,हमारी याद आयेगी,यादें – तलत,हेमंतकी,यादें महम्मद रफी की,इम्मॉर्टल एस.डी.,आर.डी अशा संगीतमय कार्यक्रमांचे निवेदन.
- अखिल भारतीय संगीत संमेलन,अखिल भारतीय मराठी गझल संमेलन,अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे नाशिक येथील आयोजनात सक्रिय सहभाग.
- "येवला शहराची गौरवगाथा" व्हीसीडी चे लेखन,निवेदन.
- विविध जाहिरातींमध्ये अभिनय.
- दैनिक देशदूत नाशिकच्या गुणगौरव सोहळयाचे सुत्रसंचालन.
- अनेक उद्घाटन समारंभ,प्रकाशन समारंभ,संगीत मैफिली,कविसंमेलन इ.चे सुत्रसंचालन.
- सध्या कुसुमाग्रज स्मारक,नाशिक येथे व्यवस्थापक म्हणून कार्यरत.

### काळाबरोबर पडणारी पाऊले – नेटाक्षरी

आधुनिक जगतात सगळीकडे संगणीकीकरण झाले.इंटरनेट मुळे ज्ञानार्जनाच्या कक्षा रुंदावल्या.काही क्षणात मनातलं जनात आणि जगात सांगायची सोय झाली.विचारांचे आदान प्रदान करण्यासाठी प्रत्यक्ष भेटीची आवश्यकता उरली नाही.हाताशी असलेले *key* आणि *mouse* "ये हृदयीचे ते हृदयी" पोहचवु लागले.

त्यातुन आकारास आला **"ऑड वाटेच्या कविता"**हा प्रातिनिधीक काव्यसंग्रह, **"काव्यांजली दिपोत्सव २००८"** हा ऑर्कुटचा पहिला ई दिवाळी अंक आणि आता दर सोमवारी मराठी साहित्याच्या विविध छटा दर्शवणारा **"नेटाक्षरी".**

अशा बदलत्या काळाबरोबर "नेटाक्षरी" ची संकल्पना घेऊन नेटाक्षरी टीमच्या ह्या अक्षर प्रेमींनी इंटरनेटवर शब्दांचा मनभावन खेळ सुरु केलाय.बदलत्या काळाबरोबर नेटाक्षरी ची पडणारी पाऊले ( की बोटे ?) बघितल्यावर म्हणावेसे वाटते..

"काळाबरोबर जो चाले , त्याची वंदावी पाऊले"

- श्री.शाम पाडेकर
( अतिथी संपादक )

# शाम पाडेकर यांचे काही शेर

❖

आम्ही कधी तव चिंतनाचा विषय गे झालोच नाही
अन कधी तव स्मृती कवाडे उघडण्या आलोच नाही
तू जरी केली कितीही आमुच्याशी बेवफाई
नाव तुझे घेतल्याविण थेंबही प्यालोच नाही

❖

ही वाट आम्हा चालण्यासी पाठ आहे जाहली
हा घाट सारा पोहण्याला लाट ही सरसावली
तरीही आली वादळे अन पूर आम्हा गाडण्या
आम्ही म्हणू की ह्या जगाने आमुची रजा मंजूर केली

❖

मृत्यूचे फर्मान होईल जेधवा मज जायचे
अन म्हणेल तो तुज अंती काही मागुनी का घ्यायचे
मी म्हणेन,थांब थोडा वेळ माझे एक आहे मागणे
मत्प्रीयेच्या गालीचा मज तीळ आहे व्हायचे

❖

रडलो जसा जन्मास येता
जन्मात तसा रडलोच नाही
जाईन असा चुपचाप की,
तुम्ही म्हणाल,गेलोच नाही

❖

ही अशीच यावी रात्र नित्य अंधारी
अन फुलवून जावी गात्र गात्र ही सारी
मी तुझ्या रेशमी मिठीत असता सखये
ती प्रातःकिरणे घरात येण्या उभी असावी दारी

❖

ही वाट इथे ही अशीच संपून जावी
अन शिणलेली ही काया माझी मीच कडेवर घ्यावी
"ती"म्हणेल जेव्हा पुरे आता ही जीवनयात्रा मेली
अन तिथेच मीही कृतार्थतेने मिटून पापणी घ्यावी







❖

विसरायचे म्हटले तरी विसरले जात नाही
विस्मृतींच्या आडगावा आम्ही कधीही जात नाही
विसरली तू जरी खंत ना याची मुळी
बेवफासे बेवफाई ही कविची जात नाही

❖

तू येणार नुसतं कळलं आम्हाला
आमची तब्येत बरी झाली
पण निघालीस ना तू जायला
तेव्हा काय सांगू ? पुन्हा थंडी भरुन आली

❖


नजरा तुझ्या नजरेस आमुच्या
जर कधी भिडल्याच नसत्या
चुकूनही समजू नको
कविता आम्हा स्फुरल्याच नसत्या
चाललो नसतो जरी
रस्त्यावरुनी त्या तुझ्या
ऐसे नव्हे जखमा जीवा
आमुच्या कधी झाल्याच नसत्या

❖

नतद्रष्टांच्या हल्ल्यामध्ये
ताज आमुचा जळतो आहे
जातीयतेच्या जाळामध्ये
हरेक इथला जळतो आहे
अश्रुंच्या सागरात एकेक
अश्रु जाऊन मिळतो आहे
माणसाला मारणारा
माणूस आम्हाला कळतो आहे

❖


सागर उल्लंघुनिया येथे मर्कट कुठले आले
राक्षस बनुनी सुवर्णनगरी जाळुनी आमुची गेले
निषेध,सांत्वन,श्रध्दांजली सारे बोथट झाले
राम गोपालासवे नेते निगरगट्ट झाले




## दोस्त हो !

मराठी शायरी,मराठी मुशायरा,मैफिल ह्या पुस्तकांनंतर भाऊसाहेब पाटणकरांचे प्रकाशित हे ४ थे पुस्तक. वरील तीनही पुस्तकातील काव्य संकलित करुन काही नवीन रचना ह्यात उध्दृत केलेल्या आहेत.

इष्क,शृंगार,जीवन,विनोद,मृत्यू,दार्शनिक असे रसरशीत विषय असलेली व धुंदावून टाकणारी अशी रंगतदार मैफिलच ह्या पुस्तकरुपाने वाचकांना लाभते.ह्या दिलेर व सच्च्या दोस्ताच्या सादेस प्रतिसाद जरुर द्या.




## दुनिया तुला विसरेल..

शायराना सी है जिंदगी की फजा
आप भी जिंदगी का मजा लिजीये..

असं गुणगुणत मी खिडकी बाहेर बघते.

निळ्याभोर आकाशाखाली उभ्या निष्पर्ण झाडावर गात असलेल्या बुलबुल इतकंच माझं मन स्वच्छंदीपणे गात असतं.

हातात असतं व.पु.काळे लिखित"दुनिया तुला विसरेल" हे भाऊसाहेब पाटणकर उर्फ वा.वा.यांच्या शायरीचं रसग्रहणपर पुस्तक.पुस्तक जरी मराठी शायरीचं असलं तरी माझ्या मनाने त्याची अवस्था हिंदीत का व्यक्त केली ह्याचं मला जराही आश्चर्य वाटत नाही.भावनांना भाषेचं बंधन नसतं.

"वसंताचं आगमन आयुष्यात झालं म्हणजे,लंडन अमेरिकेपासून आफ्रिकेपर्यंत सगळ्या तरुण मनांचं फुलणं आणि तडफडणं एकच असतं.अस्वस्थता हाच धर्म,उत्कटता हीच जात आणि प्रतिक्षा हीच वृत्ती."वपुंचं वाक्य नजरेसमोर तरळून जातं.

व.पु,काळे..व्यवसायाने आर्किटेक्ट अन इंटिरिअर डेकोरेटर असणारे वपु जगात जे म्हणून काही सुंदर आढळेल त्याचे निस्सीम उपासक.प्रतिभावान लेखक,कथाकथनकार,नाटककार,कलावंत असलेल्या ह्या सौंदर्ययात्रीने त्यांच्या समर्थ लेखणीतून भाऊसाहेबांच्या मैफिलीचा प्रत्यक्ष अनुभव आणि त्यावरील प्रकट चिंतन रसिकांच्या सेवेत पुस्तकरुपात पेश केलंय.

वपु म्हणतात,भाऊसाहेबांची शायरी हा समजावून सांगण्याचा विषय नाही.शिंपल्यातले मोती शोधण्याचा हा व्यवसाय नाही.मोत्यांची अख्खी माळच ते तुमच्या हातात ठेवतात.

नुसतेच ना दुनियेत तुमच्या,आलो अम्ही गेलो अम्ही
भगवन तुझ्या दुनियेस काही,देऊनी गेलो अम्ही
शायरी तुला अर्पून गेलो,माझे जणू सर्वस्व ती
दुनिया तुला विसरेल भगवन,ना आम्हा विसरेल ती

असं साक्षात परमेश्वरास म्हणणाऱ्या वा.वां च्या अनेक मैफिली "याचि देही याचि डोळा" अनुभवलेले वपु वाचकांना त्या धुंद मैफिलीत घेऊन जातात.त्यांच्या शायरीच रसग्रहण सांगता सांगता एखाद्या शेराबरोबर आपल्यालाही भटकंतीला घेऊन जातात व अलगद दुसऱ्या शेरापर्यंत परत मैफिलीत आणून बसवतात.प्रकट चिंतनात बोलता बोलता सहजपणे तत्वज्ञानाची पातळी गाठतात.भाऊसाहेबांची एक जिंदादिल माणूस आणि समवेतच एक मनस्वी शायर अशी दुहेरी ओळख सहजतेने करुन देत राहतात.

आणि शायरीचा हा सारा प्रवास अगदी रमत गमत चालू राहतो.कुठेही कसलाही आव नाही.अवाजवी कौतुक नाही.

समोर असते फक्त वपुंना भिडलेली शायरी आणि रसग्रहणातून उमलत जाणाऱ्या अर्थाच्या कोमल पाकळ्या.

एका तरल भावोत्कट मनाने तितक्याच संवेदनाक्षम पण दिलेर मनाला दिलेली दाद.

हा मनभावन अनुभव घ्यायला विसरु नका.जरुर वाचा.. "दुनिया तुला विसरेल"

" नेटाक्षरी " हा विनामूल्य अंक नियमित मिळण्यासाठी तसेच सूचना,अभिप्राय,प्रतिक्रियांसाठी..

netaksharee@gmail.com